Lalita Gandbhir
4200 North Ocean Dr.
1501 - 2
Riviera Beach, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
First Serial Rights

# मी मात्र आजोबा

लग्नात भवती भवती एक छोटी
चटपटीत पोरटी रेंगाळत होती.
मला म्हणाली, “हाय काका !”
हिला म्हणाली, “हाय ताई !”
मी तिला पकडून विचारलं,
“मी काका ? मग ही ताई कशी ?”
“कारण तुम्ही काकासारखे दिसता
आणि ही ताईसारखी वाटते.”
असं म्हणून ती खुद्कन हसली.
आणि पळून गेली.
हे ऐकून माझ्याकडे कटाक्ष टाकून
ही सुद्धा मिस्किल हसली.
……
दिवस उलटले, वय वाढलं.
माझे केस पांढरे झाले.
तोंडाला सुरकुत्या पडल्या
पाठीला थोड पोक आलं.
पोट सुटलं.
हिने तोंडाला कसली कसली
क्रीमस् थापली.
केस रंगवले.
जिमला जाऊन आणि

डाएट करून

वजन कमीच ठेवलं आणि

फिगर राखली.

……..

आता बायका भेटतात

मुलांना म्हणतात,

“ह्या आजोबांना नमस्कार कर.”

हिच्याकडे बघून म्हणतात,

“ह्या मावशींना नमस्कार कर.”

तेंव्हा

ही माझ्याकडे कटाक्ष टाकते.

आणि लग्नात मिस्किल हसली होती तशीच मिस्किल हसते.

समाप्त

Feb 24, 2016.